२६
जानेवारी
प्रजासत्ताक
दिन

# पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन तर्फे भारताचा ७३वा प्रजासत्ताक दिन साजरा

**गुणेश मा. आवटे**
व्यवस्थापक




२६ जानेवारी 'भारतीय प्रजासत्ताक दिन', १९५० साली ह्याच दिवशी, आपण आपली राज्यघटना (constitution) अंगीकृत केली आणि यानंतर आपला देश खऱ्या अर्थाने लोकशाही प्रधान व स्वतंत्र झाला.

सालाबादाप्रमाणे यंदादेखील हा अत्यंत महत्त्वाचा दिवस संस्थेकडून मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा केला गेला. कोविड-१९ ह्या साथीच्या रोगाच्या संभाव्य भीतीपोटी यंदा हा दिवस शासकीय नियमांचे तंतोतंत पालन करत मर्यादित लोकांच्या उपस्थितीत साजरा केला गेला. संस्थेच्या संचालकांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

*उर्वरित वृत्त पान ८ वर...*

# पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन तर्फे भारताचा ७३वा प्रजासत्ताक दिन साजरा

*पान ४ वरून...*

१५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्रीय दिन आपण संस्थेच्या नवी पेठ येथील, 'पुणे मुद्रण विद्यालय' ह्या वास्तूच्या आवारात साजरे करीत असतो. सकाळी ९ पूर्वी सन्माननीय संचालक मंडळ सदस्य नियोजित ठिकाणी उपस्थित होते. ठीक ९ वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र दि. जोशी यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यानंतर संस्थेचे मा. उपाध्यक्ष श्री. शेखर धुमाळ, मा. चिटणीस श्री. तीर्थराज ज. जोशी व इतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे पूजन केले गेले.

मा. अध्यक्षांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करून त्यांच्यासोबत संवाद साधला. संस्थेकडून साजऱ्या होणाऱ्या वर्षभरातील सर्व उत्सव, सण व इतर उपक्रमांमध्ये संस्थेचे माजी व्यवस्थापक स्व. श्री. सुनिल कदम यांची उणीव प्रकर्षाने जाणवत असल्याचे मा. अध्यक्षांनी आवर्जून नमूद केले आणि याच प्रकारची भावना उपस्थित सर्व संचालकांनी व्यक्त केली.

सलग दोन वर्षे चालणाऱ्या कोविड-१९ ह्या संसर्गजन्य साथीमुळे मुद्रण व्यवसायाचे अपरिमित नुकसान झाले, सर्व स्तरावरील मुद्रक वर्गाला याचा मोठा आर्थिक फटका बसला. गेल्या काही महिन्यांपासून आपले व्यवसायचक्र सावरणाऱ्या मुद्रक बांधवांसाठी संस्थेमार्फत ह्यापुढे व्यवसाय उपयोगी वेगवेगळे उपक्रम राबविण्याचे मनोगत अध्यक्ष महोदयांनी व्यक्त केले. संस्थेच्या पटावरील सर्व संचालकांनी आपापल्या परीने सहभाग घेऊन, पुढाकार घेऊन असे उपक्रम यशस्वी करावेत असे मतही त्यांनी व्यक्त केले. असे सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेकडून पुरेपूर सहकार्य व सहाय्य केले जाईल याची हमी अध्यक्षांनी दिली.

'पामेक्स' ह्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या, मुद्रण व्यवसायाशी संबंधित प्रदर्शन घेणाऱ्या संस्थेच्या अध्यक्षपदासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र जोशी ह्यांची निवड झाली असल्याचे मा. चिटणीस श्री. तीर्थराज जोशी यांनी जाहीर केले. तसेच पामेक्सच्या समितीत संस्थेचे ज्येष्ठ संचालक श्री. दीपक म. ढोलेपाटील यांची उपाध्यक्षपदी निवड केली गेल्याचे मा. अध्यक्षांनी जाहीर केले.

२०२३ साली मुंबईत होणारे पामेक्स प्रदर्शन यशस्वी करण्याच्या दृष्टीने संस्थेचे सर्व संचालक व पदाधिकारी पूर्ण ताकदीने सहकार्य करतील अशी शाश्वती मा. चिटणीस श्री. तीर्थराज जोशी यांनी संस्थेचे व पामेक्सचे विद्यमान अध्यक्ष श्री. रवींद्र जोशी यांना दिली. यानंतर अल्पोपहार व चहापानाचा कार्यक्रम होऊन सर्वांनी निरोप घेतला.

अशा रीतीने २६ जानेवारी २०२२ रोजी भारताचा ७३ वा प्रजासत्ताकदिन सुनियोजितपणे, आनंदाने व उत्साहात साजरा केला गेला.